# नोटीस

*(महाराष्ट्र शासनाने दुष्काळ जाहीर केलेल्या तालुक्यातील विद्यार्थांसाठी)*

**संदर्भ : मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे**

**१) दि.०१/१०/२०२६ रोजीचे पत्र क्र. ३२३५**

**२) दि.०८/१०/२०२६ रोजीचे पत्र क्र. ३२६३**

**२) दि.१५/१०/२०२६ रोजीचे पत्र क्र. ३३१९**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडून प्राप्त वरील संदर्भीय पत्रांच्या अनुषंगाने या महाविद्यालयातील सर्व विधी अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना कळविण्यात येते कि जे विद्यार्थ्यी महाराष्ट्र शासनाने दुष्काळ जाहीर केलेल्या तालुक्यांमधील रहिवाशी असून त्यांच्या सर्व कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रुपये आठ लाखापेक्षा कमी आहे आणि सद्यस्थितीत महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याही शिष्यवृत्तीस ते पात्र ठरत नाहीत असे सर्व विद्यार्थी हिवाळी परीक्षा २०२६ करिताच्या परीक्षा शुल्क सवलतीस पात्र होत आहेत.

अशा पात्र होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते कि परीक्षा अर्ज भरण्या अगोदर किंवा परीक्षा अर्जासोबत खालील कागदपत्रे आणि हमीपत्र भरून ऑफिसमध्ये जमा करावेत आणि परीक्षा शुल्क सवलतीचा लाभ घ्यावा. जर विद्यार्थ्यांनी दिलेल्या कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळून आली आणि त्यामुळे त्या विद्यार्थ्यांना सदर सवलत प्राप्त झाली नाही तर त्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा अर्जानुसार देय असणारी परीक्षा शुल्काची रक्कम विद्यापीठास / महाविद्यालयास विहित वेळेत भरण्याची जबाबदारी त्या संबंधित विद्यार्थ्याची राहील.

१) रहिवाशी प्रमाणपत्र/ अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

२) आर्थिक वर्ष २०२५-२६ चा उत्पन्नाचा दाखला (Income Certificate)

३) हमीपत्र (Format available in office)

Deccan Education Society's Shri Navalmal Firodia Law College, Pune-4

दि. २१ /१०/२०२६

डॉ. सुनिता आढाव

**प्राचार्या**
**डेक्कन एज्यूकेशन सोसायटीचे**
**श्री नवलमल फिरोदीया विधी महाविद्यालय**
**पुणे-४११००४.**